**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue 50 , Vol. III<br>July. 2021 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

# July 2021 Issue- 50 Vol. III

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 50 , Vol. III | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
July. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

11. केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ.संजय मारोतीराव कोनाळे

12. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची अवस्था : एक अवलोकन 75

प्रा. देविदास गोविंदराव चव्हाण

13. महात्मा फुले यांचे जीवन व कार्य 78

प्रा डॉ. बाबासाहेब देशमुख

14. लोककल्याणकारी राज्यांसाठी उत्तम प्रशासनातील व्यवस्थापनाची कार्य 83

स्वाती वसंतराव सूर्यवंशी

15. होट्टल : वास्तुशिल्प एक ऐतिहासिक वारसा. 87

स्नेहलता स्वामी

16. आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास 91

प्रा.डॉ.बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 50, Vol. III | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
July. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रा.डॉ.बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर**
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

**प्रस्तावना**

भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणून आदिवासी जमातीकडे बघितले जाते. भारतीय समाजातील आदिवासी विषयी वैदिक वाङ्मयात उल्लेख आढळतो. जगातील सर्व राष्ट्रामध्ये आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. विशेषत: आशिया, आफ्रिका, अमेरिका खंडातील राष्ट्रामध्ये आजही आदिवासी जमाती आढळतात. यूरोपमध्ये आदिवासी जमातीचे मोठ्या प्रमाणात आधूनिकीकरण झाल्याने त्यांना ओळखणे कठीण आहे.[1] आशिया खंडातील राष्ट्रांचा विचार केल्यास या राष्ट्रांमध्ये आदिवासी जमातीचे अस्तित्व दिसून येते.

भारतामध्ये विविध जाती, धर्म आहेत. सहा हजारापेक्षा अधिक जाती आहेत. याचप्रमाणे विविध आदिवासी जमाती आहेत. देशातील सर्वच राज्यामध्ये आदिवासीच्या 250 जमाती आहेत. यामधील उपजातींचा विचार केल्यास हे प्रमाण 450 आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विकासाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. विकासाच्या कक्षा रुंदावत असताना, विविध क्षेत्रात क्रांती घडून येत असताना भारतीय समाजाचा मुख्य भाग असणारी आदिवासी जमात मात्र या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याचे दिसून येते. या जमातीचा फारसा विकास अद्यापर्यंत झालेला नाही. भारतीय आदिवासी जमातीचा पूर्व इतिहास अभ्यासत असतांना प्राचीन वैदिक वाङ्मयात याविषयीचा उल्लेख आढळतो. यामध्ये आदिवासी जमातींना राक्षस, मानव भक्षक, कावळ्यापेक्षाही काळे, खुजे, चपट्या नाकाचे, कोळशासारखे काळे अशा विविध विशेषणांनी संबोधले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आर्य भारतात येण्यापूर्वीपासून या वन्य जमाती भारतामध्ये वस्ती करुन होत्या.[2]

**उद्देश :** प्रस्तुत अध्ययन विषयाची उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

1. आदिवासी जमातीचा इतिहास जाणून घेणे.
2. आदिवासी जमातीच्या सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

1. आदिवासी जमात भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे.
2. आदिवासी जमातीचे सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक जीवन अभ्यास वैशिष्ठयपुर्ण आहे.

**आदिवासी जमातीचा इतिहास**

आदिवासी हे भारतातील मुळ रहिवासी आहेत. त्यांच्यापेक्षा प्रगत जमातींनी त्यांच्यावर आक्रमण करुन त्यांचा भुभाग बळकावला. मानवी संस्कृती ही रानटी अवस्थेपासून ते आजच्या प्रगत अवस्थेपर्यंत पोहचली आहे. म्हणजे आजच्या आपल्या संस्कृतीची बीजे ही आदिमानवाच्या जीवनप्रणालीत आहेत.

आदिवासी हे भारतात प्रारंभापासून राहणारे मुळ रहिवाशी आहेत. यामूळे या जमातींना आदिम जमाती असे म्हटले आहे. एशिया मायनर मधील बेबीकॉन येथे केलेल्या संशोधनवरुन आर्यांचे इ.स.पू. 1500 च्या सुमारास भारतात आगमन झाले असावे हे संशोधकांनी मान्य केले आहे. यामूळे आदिवासी जमाती ह्याच भारतातील मुळ रहिवाशी आहेत. रामायण व महाभारत या आपल्या धर्मग्रंथामध्येही अनेक आदिवासींचा उल्लेख आहे. पुरातत्वशास्त्रानुसार सापडलेल्या पुराव्यावरुन इ.स. पूर्व 2000 व त्यापेक्षा प्राचीन कालखंडाचा पट सुचित केला जातो. यावरुन रामायण, महाभारत, वेदवाङ्मय आदि आर्याशी संबंधीत असलेल्या वाङ्मयाचा व इतिहासामध्ये उपलब्ध पुराव्यापूर्वी येथे आदिवासी लोकजीवन होते.[4] भारतात असणाऱ्या या आदिवासी जमातींना विविध नावाने संबोधले जाते. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र ओळख आहे. भारतीय आदिवासी जमातीची सर्वमान्य अशी व्याख्या यामूळे प्रचलित होऊ शकलेली नाही. अनेक मानववंश शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्याख्या दिल्या आहेत. परंतू त्या परिस्थितीक आहेत. त्या कुठल्याही एका जमातीसाठी उपयूक्त ठरतात यामुळे त्यांची उपयोगिता मर्यादीत आहे.[5] आदिवासी हे भारताचे मुळ रहिवाशी असून त्यांचा इतिहास

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 50, Vol. III | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
July. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

पराक्रमाचा आहे. रामायण काळात शबरी महाभारतात एकलव्य, हिडींबा यांचा उल्लेख आहे.[6] छत्रपती शिवाजी महाराजास रामोशी, कोळी जमातीचे सहाय्य मिळाले होते.[7] भारतीय स्वातंत्र्य लढ्यातही आदिवासी जमाती अग्रस्थानी होत्या.

भारतातील 28 घटकराज्यमध्ये 500 पेक्षा अधिक आदिवासी जमाती आहेत.[8] 1935 मध्ये ब्रिटीश संसदेने कायद्याव्दारे काही विभागांना काही प्रमाणात स्वायत्तता देऊन विधिमंडळे बनवण्यात आली होती. दलित आणि आदिवासींना सामाजिक न्याय व प्रतिनिधीत्व मिळण्याच्या हेतूने त्याची एक सूची बनवण्यात आली. अशाप्रकारे अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती हे शब्द व्यवहारात आले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात अनुसूचीत जमाती हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. संविधानाच्या 342 व्यास कलमात अनुसुचित जमाती म्हणजे राष्ट्रपतीने बनवलेल्या अनुसूचीतील जमातीच्या सुचीतील जमात असे म्हटले आहे.

**सामाजिक जीवन**

महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. या जमातीच्या जीवनाविषयी मागील 70 वर्षामध्ये इतर समाजघटकांना माहिती प्राप्त झाली आहे. महाराष्ट्रात असणाऱ्या या प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक जीवन सारखे आढळत नाही. या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन त्यांच्या सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक, आणि पारंपारिक चालत आलेल्या आणि रुढ झालेल्या जीवन सृष्टीने बनवलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य आदिवासीचे जीवन, त्यांची मुल्ये वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो. आदिवासी जमातीमधील व्यक्ती हा भोळाभाबडा, अबोल, प्रामाणिक, पापभिरु, दैववादी, परंपरागत जीवन दृष्टीचा, निसर्गाच्या सानिध्यात रमणारा, जीवनाचा स्वच्छंदतेने आनंद घेणारा आहे. त्याचे वास्तव्य जंगलात असले तरी त्यांची राहणी त्यांच्या निर्मळ अंत:करणाने साधी व सरळ असते. त्यांच्यातील आत्मीयता व सचोटी हे गुण वाखावण्यासारखे आहेत. त्यांची जीवनाकडे बघण्याची स्वतंत्र दृष्टी आहे.

आदिवासीचा पेहराव अगदी साधा असतो. कमरेला लंगोटी किंवा गुढघ्यापर्यंत लावलेला धोतराचा काच्या, अंगात कोपरी किंवा पेहरण असा असतो. स्त्रियांचा पेहराव प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळा असतो. कोकणा, महादेव कोळी, ठाकर जमातीच्या स्त्रीया डोक्यावर फडकी नावाचे वस्त्र घेतात. हे वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिजाईन केलेले असते. भिल्ल जमातीमधील स्त्रीया ह्या नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे करतात. एक तुकडा नेसतात व दूसरा तुकडा डोक्यावर घेतात. ठाकूर, कातकरी, भिल्ल या जमातीच्या स्त्रीयांच्या पेहरावात भिन्नता आहे. दागदागिने वेगवेगळी आहोत.[9]

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीमधील मुलामुलीचे लग्न वयात आल्यानंतर 15 ते 16 वर्षामध्ये होतात. आदिवासी जमातीमध्ये बहूपत्नीत्वाची पध्दत अस्तित्वात आहे. घटस्फोटाचे प्रमाणही अधिक आहे.[10] महाराष्ट्रातील आदिवासी जमाती जंगलामध्ये वास्तव्य करीत असल्याने त्यांना शुध्द पाणी पिण्यासाठी मिळत नाही. त्यामुळे मलेरिया, हगवण, ताप, पोटाचे विकार, क्षय, यांच्याशी सामना करावा लागतो. रोगराई संबंधी त्यांच्या कल्पना पारंपारिक व भ्रामक आहेत. जादुटोणा, बुवाबाजीच्या माध्यमातून उपचार करण्यावर त्यांचा भर आहे. कुपोषण मोठ्या प्रमाणात आहे. अमरावती, धूळे जिल्ह्यात कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे.[11]

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाजाच्या शैक्षण्कि प्रगतीसाठी शासकीय स्तरावर प्रयत्न झाले. महाराष्ट्रामध्ये आदिवासी जमातीसाठी शासकीय आश्रमशाळा सुरु आहेत. या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न सातत्याने होत आहेत. आदिवासी विभागात आश्रमशाळा, शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न करीत आहेत. तरीदेखील आदिवासी जमातीची फारशी शैक्षणिक प्रगती होऊ शकलेली नाही. याचे कारण आदिवासी जमातीमधील पालकाची मानसिकता, अज्ञान, गरीबी हे आहे. 22 टक्क्यापर्यंत साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे.परंतू शाळेमध्ये शिक्षणाचे माध्यम असणारी भाषा आणि बोलीभाषा वेगवेगळी असल्याने आदिवासी जमातीमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मागासलेपणास कारण ठरत आहे. एकंदर आदिवासी जमातीची सामाजिक जीवनाचा विचार केल्यास यामध्ये सुधारणा होत असल्याचे दिसते. परंतू प्रगत नागरी समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाचे सामाजिक जीवन अत्यंत परंपरागत व मागास असल्योच दिसते.[12]

**आर्थिक जीवन**

आदिवासी जमातीचे आर्थिक जीवन हलाखीचे आहे. त्यांचे उपजीवीकेचे साधन शेती, शेतमजूरी आणि जंगलात प्रामुख्याने आहे. शेतीव्यवसाय करणाऱ्यामध्ये स्वत:चे शेत असणारे, कुळ म्हणून शेत करणारे आणि शेतमजूर असे प्रकार दिसतात. कुळ कायदयापूर्वी अनेक लोक शेतमजूर होते. कायद्याच्या आधारामुळे ते आता शेतमालक झाले आदिवासी जमातीमधील शेतमजूरांची संख्या 45 टक्के आहे. ज्यांच्याकडे शेतजमीन आहे ते शेतकरी परंपरागत पध्दतीने शेती करतात. त्यामूळे शेतीतून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे.

Attested.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Issue 50, Vol. III | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
July. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

शेतीशिवाय दूसरा व्यवसाय म्हणजे मजूरी, लाकुड वाहणे, जंगलातील डिंक, मध, तेंदुची पाने, बांब, मोहाची फुले, कडीपत्ता, शिकेकाई, हिरडा, बेहडा, कोकम, जंगली फळे या व्यतिरिक्त रोजगार मिळवून देणारा जोडधंदा आदिवासींना मिळत नाही. ठाणे जिल्ह्यातील काही भागात गवत कापण्याचा व्यवसाय मिळतो. शेतीच्या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न अपूरे आहे. तेंदूपत्ता, गवत कापणे हे व्यवसाय हिवाळीनंतर सुरु होतात. ह्यातून दोन ते तीन महिने रोजगार मिळतो. इतर वेळेस मात्र त्यांना काम मिळत नाही. ह्यामुळे आदिवासींना कर्ज घेऊनच सण समारंभ व इतर विधी पूर्ण करावे लागतात. अशा प्रकारच्या कर्जावर सावकार भरमसाठ व्याज आकारतात. या कर्जबाजारीपणातून आदिवासींना बाहेर काढण्यासाठी सहकारी सोसायट्या शासकीय योजना सुरु आहेत.[13]

**धार्मिक व सांस्कृतिक जीवन**

आदिवासी जमातीचे सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासी जमातीच्या धार्मिक रुढी ह्या निसर्ग आणि प्राणी पुजेतून निर्माण झाल्या आहेत. निसर्गातील गुढ अनाकलनीय ते सर्व पुजनीय असे ते मानतात. आकाशात चकमणारी वीज, सुर्य, चंद्र, तारे, ढग, प्रचंड वृक्ष, वाघ, सिंह, साप, विंचू अशा निसर्गनिर्मित वस्तू व प्राण्यांची पुजा करतात. त्यांच्यात वनदेव, डोंगरदेव, हिरवा, दिमाई, बिरसादेव, वृक्षपेन, वाघदेव, पित्ता, घरतारी, नारनदेव, फत्तेपूरी इत्यादी देवदेवता आहेत. आदिवासी आपल्या पितरांना व पुर्वजांना देव मानतात. भुत-पिशाच्यादेखील त्यांना देवदेवता सारखी वाटतात. ते चेडा, मुंजा, सुपली, वीर, हडळी, खैस, इत्यादी नावांनी ओळखली जाता. दगडाचे किंवा लाकडाची मुखवटे करुन गावाच्या वेशीबाहेर उभी केलेली दैवते हे त्यांचे पूर्वज असतात. याशिवाय बऱ्याच आदिवासी जमातीनी हिंदू देवताचा स्विकार केला आहे. दत्तेश्वरी, मलदेवी, चामुंडा, महादेव, भैरोबा, खंडोबा, मारुती, इ. देवतांची पूजा करतात. कॉलरा, देवीसारखी रोगराई असल्यास पिशाच्याच्या कोपामुळे रोगराई होते अशी त्यांची समजूत असते. रोगराई कशी उदभवते हे शोधून काढण्यासाठी भगत असतो. भुत पिशाच्याचे निर्मुलन किंवा बंधक करण्याचे तंत्र भगताला अवगत असते यावर आदिवासीचा विश्वास आहे. भोळेभाबडे आदिवासी भगताने सुचवलेले उपाय स्विकारतात. आदिवासीमध्ये दारु ला सामाजिक व धार्मिक विधीमध्ये विशेष महत्व आहे. जन्म, मृत्यू, लग्न, वंछलत पाहूण्याचा सत्कार, देणे-घेणे कोणत्याही निमित्ताने दारु पिण्याचा कार्यक्रम होतो. काही जमातीत मुले आणि स्त्रिया देखील दारु पितात. जन्मापासून त्यांची ही सवय असते. मुल जन्मल्यानंतर मुलाच्या तोंडात दारुचा थेंब टाकला नाही तर मुल नशिबवान निघणार नाही असा त्यांचा समज आहे.

आदिवासी जमातीत हिंदूचे सण मोठ्या प्रमाणात साजरे करतात. आदिवासी जमातीमध्ये बाळंतपणासाठी जी स्त्री असते तिला सुईण किंवा सोयरीर असे म्हटले जाते. ती मुले जन्माला आल्यानंतर त्यांची नाळ कापण्याचे काम करते. गर्भवती स्त्री मरण पावल्यास ती हडळ होते असा गैरसमज या जमातीमध्ये आहे. माडिया, गोंड, आदिवासीत गोईलची प्रथा आहे. गोटूल म्हणजे गावातील तरुण तरुणीचे निवासस्थान समजले जाते. रात्री जेवण झाल्यानंतर तरुण-तरुणी एकत्र जमतात. नृत्य व गाणे याचे धडे तिथेच मिळतात. गाणी व नृत्य हे आदिवासीचे वैशिष्ट्य आहे. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी नृत्य केली जातात.[14] तारवा, कमाठी, छीर, भावडा, करमा, भगोरा, पण्डार, होलीनाच, डुडका यासारखे अनेक कितीतरी प्रकारचे नाच करण्यात आदिवासी रमलेले असतात.

**निष्कर्ष**

1. प्रगत नागरी समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाचे सामाजिक जीवन अत्यंत परंपरागत व मागास असल्योच दिसते
2. आदिवासी जमातीचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण असुन आदिवासी जमातीच्या धार्मिक रुढी ह्या निसर्ग आणि प्राणी पुजेतून निर्माण झाल्या आहेत.
3. आदिवासी जमातीचे आर्थिक जीवन हलाखीचे असुन त्यांच्या उपजीवीकेचे साधन शेती, शेतमजूरी आहे.
4. आदिवासी जमातीचे गाणी व नृत्य हे वैशिष्ट्य आहे. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी नृत्य आदिवासी जमातीकडून केली जातात.

**सारांश**

आदिवासी जमात ही प्राचीन काळापासून डोंगरदऱ्यात, जंगलात वास्तव्य करीत आली आहे. या आदिवासी जनसमुहांना भारतामध्ये विविध नावाने ओळखले जाते. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती हा उल्लेख केला आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाजामध्ये प्रबोधन चळवळीस सुरुवात झाली. यामधून मोठ्या प्रमाणात भारतीय समाजाचे सामाजिक परिवर्तन झाले. समाजातील वर्षानुवर्षे चालत आलेल्या वाईट प्रथा, परंपरा दूर करुन

Attested



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

नवसमाज निर्मितीचे प्रयत्न सुरु झाले. याला आदिवासी जमातही अपवाद नाही. ब्रिटीशांच्या काळात भारतातील आदिवासी जमातीचा प्रगत समाजाशी संपर्क वाढला. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी जमातींना राष्ट्रीय प्रवाहात समाविष्ठ करुन घेण्याचे प्रयत्न संविधानाच्या माध्यमातून केले. संविधानामध्ये आदिवासीच्या विकासासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या. याशिवाय शासकीय धोरणाच्या माध्यमातून आदिवासी जमातीचा विकास करुन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. याचा परिणाम त्यांच्यामध्ये बऱ्याच प्रमाणात परिवर्तन होण्यात झाला आहे. आदिवासी जमातीची जी वैशिष्ट्ये होती, ती विशेष ओळख होती ती वैशिष्ट्ये काळाच्या ओघात नष्ट झाली आहेत व होत आहेत. आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व प्रगत नागरी संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या बिकट, विदारक व गुंतागुंतीच्या आहेत.पारंपारिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमध्ये नवनवीन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी, इ. समस्याची भर पडली. परिणामी, आदिमांच्या जीवनात उदासिनता, नैराश्य निर्माण झाले. सत्यप्रिय, कष्टाळू, साधाभोळा, प्रामाणिक व धर्मवेडा आदिवासी या समस्यांपुढे शरणागती पत्करुन आपल्या अस्तित्वाची लढाई हारतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. आदिवासी जमात ही भारतीय समाजव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. या जमातीची स्वतंत्र संस्कृती आहे.

**संदर्भसूची**

1) देवगावकर,शैलजा.,देवगांवकर, श.गो., (2001), आदिवासी विश्व, नागपूर, आनंद प्रकाशन, 1.
2) फडके, सुधीर., (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, 6.
3) फडके, सुधीर., (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, 7.
4) गावित,डॉ.माहेश्वरी., (2008), महाराष्ट्रातील आदिवासी, मराठी साहित्य, पुणे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, 13.
5) दास, शिवतोष., (1983), भारत की जनजातीया, दिल्ली, किताबघर, 95.
6) गारे, गोविंद.,(1993), भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, औरंगाबाद, अमृत प्रकाशन, 9.
7) जोशी,तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री.,(1976),मराठी विश्वकोष खंड 2, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, 29.
8) डॉ.तेगमपुरे,मारोती.,(2009),आदिवासी विकास आणि वास्तव, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन, 16.
9) गारे,डॉ.गोविंद.,(2000),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 17.
10) गारे,डॉ.गोविंद.,(1986),आदिवासी विकासाचा आर्थिक कार्यक्रम, पुणे, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, 10.
11) गारे,डॉ.गोविंद.,(1988),महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती, समस्या व विकास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,18.
12) गारे,डॉ.गोविंद.,(1988),महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती, समस्या व विकास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,22
13) गारे,डॉ.गोविंद.,(1988),महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती, समस्या व विकास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,23
14) फडके, सुधीर., (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन,27

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Dist.Hingoli.(MS.)